पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे–३८

# मराठी राजभाषा गौरव दिन अहवाल

दि.२७/०२/२०१९

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी जवळजवळ दीडशे म्हणींचे संकलन केले. म्हणी, शब्दप्रयोग हे त्या –त्या भाषेचे सौंदर्य असते; पण संस्कृतीतील बदलानुसार यामध्ये देखील तसेच शब्दप्रयोगांमध्ये देखील बदल होत असतात. काळानुरूप बदल होताना आपल्या भाषेतील मूळ शब्द टिकवून ठेवणे ही त्या –त्या भाषिक समाजाची जबाबदारी असते. कारण भाषा ही त्या–त्या काळाचे व राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध घटकांचे प्रतिबिंब असते. त्या–त्या समाजाची अस्मिता, व्यवहार या भाषेमध्ये व्यक्त होत असते. म्हणनूच भाषा संवर्धनाचे दृष्टिकोनातून महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने लोपत चाललेल्या शब्दांचे तसेच म्हणींचे जतन करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जतन केलेल्या म्हणी व शब्दांचे वाचन केले. महाविद्यालयाच्या मराठी विभागामार्फत राजभाषा दिनाच्या प्रसंगी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी विभागप्रमुख डॉ.विजय बालघरे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात ते म्हणाले की, ''आपली भाषा एवढी समृध्द असूनही असे दिवस साजरे करण्याची वेळ आपल्यावर का येते? समाजाच्या विकासाबरोबर भाषेचाही विकास होणे अपेक्षित असते. तसेच संस्कृती, समाज यांचे प्रतिबिंब भाषेमध्ये उमटते. त्यामुळे कोणताही समाज आहे तसा त्या भाषेतून आपणास दिसतो. मराठी भाषेस समृध्द असा वारसा आहे. ती अभिजात आहे, परंतु पाठपुरावा करूनही तिला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. मराठी जरी राजभाषा असली तरी शासनव्यवहारात आणि महाराष्ट्रातील सर्व शाळा, महाविद्यालये व प्रशासकीय कामांमध्ये तिचा वापर होतो काय? यामागे सरकारची उदासिनता, मराठी भाषिक समाजाचा न्यूनगंड कारणीभूत आहे. भाषा आणि ज्ञान यांचा जवळचा संबंध आहे. तुमच्याकडे नावीन्यपूर्ण कल्पना व ज्ञान असेल तर जगामध्ये त्याची उपयुक्तता असेल तर त्याला आपोआप महत्त्व प्राप्त होते. किंबहुना तुम्ही तुमच्या स्थानिक भाषेमध्ये जे काही चांगले आहे ते देण्याचा प्रयत्न केला तर कालांतराने ते जगभर पोहोचू शकते. त्यासाठी तुमची प्रादेशिक भाषा ही अडसर असू शकत नाही. म्हणून प्रत्येकाने आपापल्या भाषेमध्ये व्यक्त व्हावे आणि भाषेचा न्यूनगंड बाळगू नये. '' त्यांनी मराठी भाषेची समृध्द परंपरा, मुक्तेश्वर, ज्ञानेश्वर, तुकाराम, संत, पंत, शाहीर, आधुनिक व समकालीन साहित्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जतन केलेल्या म्हणी व शब्दांचे सर्वांसमोर सादरीकरण केले.

(14)

या स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या नम्रता नवास्कर या विद्यार्थिनीचा 'जोहार' ही कांदबरी देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी इंग्रजी विभागप्रमुख डॉ.श्रीनिवास इपलपल्ली, प्रा.हरिदास खेसे, प्रा.अनिता गाडेकर, विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख डॉ.आदिनाथ पाठक, प्रा.लक्ष्मण उकिर्डे व मराठी विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सुषमा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागातील दिनेश जोरी, किशोर जाधव, अनिल सोनवणे, नेहा म्हात्रे, नम्रता नवास्कर व कल्याणी पडवळ या विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले.

डॉ.विजय बालघरे
मराठी विभागप्रमुख

प्राचार्य
प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
४८/१अ, एरंडवणा, पौड रोड, पुणे-३८